# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू-भगिनींनो,

दि. 20/02/2017 रोजी सर्व मान्यताप्राप्त युनियनचे प्रतिनिधी व मॅनेजमेंट यांची कलकत्ता येथे 2004 च्या MOU संदर्भात मिटींग पार पडली. सदर मिटींगमध्ये चर्चेअंती मॅनेजमेंटने प्रमोशनमधील 18 वर्षांच्या कालावधीपैकी केवळ 2 वर्षे कमी होतील असे घोषित केले. मॅनेजमेंटच्या या निर्णयाच्या विरोधात सभागृहात विरोध झाल्यामुळे एकूण 3 वर्षे कमी करण्याबाबत विचार करु असे मॅनेजमेंटने सुचविले. एकूण प्रमोशनमधील 3 वर्षे कमी करण्याबाबतच्या या मॅनेजमेंटच्या निर्णयास काही युनियन्सनी सहमती दर्शविली असता मा. श्री. प्रदीप मयेकर यांनी मॅनेजमेंटच्या या निर्णयास साफ नकार देत सभागृहात ठामपणे खुलासा केला कि, 2004 च्या MOU संदर्भात मॅनेजमेंटने जी कमिटी गठीत केलेली आहे ती कमिटी बनण्यापूर्वी हा MOU अन्यायकारक असून नविन कामगारांचे नुकसान करणारा आहे असे वारंवार गेली अनेक वर्षे कर्मचारी संघटना पत्रव्यवहार करुन मॅनेजमेंटच्या निदर्शनास आणून देत होती. आणि मॅनेजमेंटला नविन कामगारांचे या MOU मुळे नुकसान झालेले आहे हे कर्मचारी संघटनेचे म्हणणे पटल्यामुळेच मॅनेजमेंटने सदर कमिटी गठीत केली होती. अन्यथा त्याच वेळी मॅनेजमेंटने कर्मचारी संघटनेस कळविले असते कि 2004 चा MOU हा त्यावेळी मान्यताप्राप्त असलेल्या युनियन्सनी सर्वांच्या सहमतीने केलेला असून यात कोणताही बदल होणार नाही. त्याचप्रमाणे या कमिटीला आज जवळजवळ तीन वर्षे होत असून या काळात सदर कमिटीच्या ओएनजीसीच्या वेगवेगळया राज्यात अनेक मिटींग झालेल्या असून यामध्ये ओएनजीसी मॅनेजमेंटचा बराच पैसा व सर्व मान्यताप्राप्त युनियनचा बराच वेळ खर्ची झालेला आहे. एवढ्या मोठ्या कालावधीनंतर जर मॅनेजमेंट असा निर्णय घेत असेल तर तो दूर्दैवी असून कर्मचारी संघटनेने या निर्णयाचा जोरदारपणे विरोध दर्शविलेला आहे.

मा. श्री. प्रदीप मयेकर यांनी सभेमध्ये सविस्तर खुलासा केला कि, एकूण साधारणत: साडेसहा हजार नविन कर्मचारी ओएनजीसी मध्ये नव्याने रुजू झालेले असून त्या सर्वांचे या MOU मुळे नुकसान झालेले आहे तसेच सन 2020 पर्यंत अनेक कर्मचारी सेवानिवृत्त होणार असल्यामुळे मोठ्या संख्येने नविन कर्मचारी ओएनजीसीत रुजू होणार असून येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे देखिल या MOU मुळे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे इतर PSU मधील अनेक कंपन्यांमध्ये डिप्लोमा ही पात्रता असलेल्या कर्मचाऱ्यांना कोणत्या LEVEL ला घेतले जाते याचा देखिल खुलासा केला.

2004 सालामध्ये ज्यांनी हा MOU केला तीच मंडळी आता या MOU त सुधारणा होत नाही म्हणून कर्मचारी संघटनेच्या विरोधात नविन कामगारांना भडकावित आहे. या मंडळींचे असे म्हणणे आहे कि ज्यावेळी आम्ही सदर MOU केलेला होता त्यावर फक्त आमच्या स्वाक्षऱ्या आहेत. हा MOU, Labour Commissioner च्या समोर रजिस्टर झालेला नाही. त्यामुळे "हा करार रद्द होवू शकतो." परंतू तो रद्द करण्यात आज कर्मचारी संघटना अपयशी ठरतेय. अरे हा MOU रद्द करणे जर एवढे सोपे होते तर हा MOU केल्यानंतर हिच मंडळी पुढिल तीन वर्षे मान्यताप्राप्त होती त्यावेळी हा करार रद्द करण्यास यांना कोणी अडविले होते. वास्तविक हा झालेला करार सुधारण्याकरीता भविष्यात कधी Reopen होईल याची यांनी स्वप्नातदेखिल कल्पना केलेली नव्हती. आणि त्यामुळेच कर्मचारी संघटनेच्या प्रयत्नांनी जेव्हा Review Committee गठीत झाली त्याचवेळी यांच्या पोटात भीतीचा गोळा उठलेला होता. तेव्हापासून हि मंडळी सर्व तऱ्हेने प्रयत्न करुन ह्या MOU मध्ये सुधारणा होवू नये यासाठी प्रयत्नशील होती. निवडणूकीच्या राजकारणात व प्रचारात कर्मचारी संघटनेने MOU मध्ये सुधारणा केली नाही अशी ओरड करुन ह्याच लोकांनी कामगारांना भडकविण्याच काम केले. या MOU त सुधारण्यासाठी एका ओळीचे पत्रदेखिल यांनी आजपर्यंत मॅनेजमेंटला लिहिलेले नाही. ना कधी यांनी यासाठी आंदोलन छेडलेले आहे.

मध्यंतरी या मंडळींनी या कमिटीचे महत्व कमी करण्यासाठी मा. पेट्रोलियम मिनिस्टरना निवेदन देण्याचा स्टंट केला व त्यानंतर त्वरीत सोशल मिडीयावर फोटो टाकून व पत्रक काढून मेसेज दिला कि आम्ही थेट मा. श्री. धर्मेंद्र प्रधान यांची या विषयावर भेट घेतली असून त्यांनी आम्हाला सांगीतले आहे कि, ओएनजीसीचे HR/ER इतर कंपन्यांच्या तुलनेत एकदम worst असून मी ओएनजीसीला आदेश देईन कि, डिप्लोमाधारक कर्मचाऱ्यांना डायरेक्ट JE या पदावर Upgrade करा तसेच ज्या कर्मचाऱ्यांकडे डिग्री आहे त्यांना E-1 साठी कोटा ठेवा. आज हे निवेदन देवून जवळजवळ एक वर्ष होत आलेले आहे. काय झाले पुढे त्या निवेदनाचे? मा. मंत्र्यांनी आदेश देवूनसुध्दा एवढ्या कालावधीनंतर मॅनेजमेंटने एकूण अठरा वर्षांपैकी केवळ दोनच वर्षे कमी करण्याचा उद्दामपणा मॅनेजमेंटने का दाखवला याचे उत्तर ही मंडळीच देवू शकतील.

आज सदर कमिटी सकारात्मक प्रतिसाद देत नसल्यामुळे बऱ्याच कामगारांचे असे मत आहे कि, कर्मचारी संघटनेने मॅनेजमेंटच्या विरोधात ॲक्शन प्लॅन द्यावा. वास्तविक सदर कमिटी गठित झाल्यापासून ठराविक कालावधीपर्यंत कमिटीच्या बैठका नियमित चालू होत्या. तसेच सकारात्मक चर्चाही होत होत्या. काही नेतमंडळी जाणिवपूर्वक विसंगत मागणी करुन मॅनेजमेंटला गोंधळात टाकत असल्याचे लक्षात येताच कर्मचारी संघटनेने थेट मा. चेअरमन श्री. दिपक सराफ यांना पत्र पाठवून 2004 च्या MOU चे प्रकरण काय आहे व कर्मचारी संघटनेची मागणी काय आहे ते सर्विस्तर कळविले होते. बहूसंख्य कामगारांशी चर्चा करुन 18 वर्षातील 9 वर्षे कमी करावीत हि त्यातील प्रमुख मागणी होती. त्यानंतर झालेल्या सभेमध्ये मॅनेजमेंट एकूण सहा वर्षे कमी करण्याबाबत सकारात्मक चर्चा होत होती. आणि मॅनेजमेंटचा हा कल बहूसंख्य नविन कामगारांना मान्य देखिल होता. त्यामुळे कर्मचारी संघटनेने संयमी राहून चर्चेला प्राधान्य दिलेले होते. त्याशिवाय मॅनेजमेंटच्या हाताशी त्यावेळच्या सर्व मान्यताप्राप्त युनियनच्या सह्यांचा MOU असल्यामुळे निश्चितपण मॅनेजमेंटची बाजू भक्कम तर होतीच. त्यामुळे टोकाची आक्रमक भुमिका घेतली तर मॅनेजमेंट हि कमिटीच windup करण्याचा धोका असल्यामुळेच सुसंवाद साधून कामगारांना जास्तीत जास्त फायदा कसा होईल यासाठी कर्मचारी संघटना प्रयत्नशील होती.

एवढ्या साऱ्या वाटचालीनंतर व 18 वर्षातील सहा वर्ष कमी करण्यासाठी अनुकूल असलेली मॅनेजमेंट जर आज केवळ दोन वर्षेच कमी करीत असेल तर असेही कामगारांच्या हाती काहीच पडत नसेल तर मॅनेजमेंटशी दोन हात करुन आपला हक्क मिळविण्यासाठी आज आक्रमक होण्याची वेळ आलेली आहे. आम्ही सर्व कामगारांना सूचित करु इच्छितो कि, आपण सर्वांनी एकजूटीने मॅनेजमेंटच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी तयार रहावे. आता आंदोलनाचे हत्यारच आपणास उपसावे लागणार आहे कारण Laptop, Data card इ. सुविधा देण्याचे मॅनेजमेंटने कबूल करुनसुध्दा अशीच टाळाटाळ करुन विलंब करीत होती. शेवटी प्रत्येक JCM मध्ये चर्चा करुनही मॅनेजमेंट ऐकत नाही असे लक्षात येताच कर्मचारी संघटनेने पूर्ण ताकदीनीशी सर्व वर्कसेंटर्सना निदर्शने चालू केली. परंतू यावेळी एक गोष्ट लक्षात आली कि Laptop, Data card साठी आंदोलन करा असे कर्मचारी संघटनेला वारंवार सूचविणारी बरीचशी मंडळी आपल्यावर मॅनेजमेंटची कारवाई होईल म्हणून मुंबईत किंवा जवळपास असून देखिल आंदोलनात उतरली नाहीत. उलट ज्यांना कित्येक वर्षापासून या सवलती मिळत आहेत त्या कामगारांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात भाग घेवून सर्व वर्कसेंटर्सना हादरवून सोडले होते. त्यामुळे आपणा सर्वांना आवाहन करण्यात येत आहे कि आपण मोठ्या संख्येने एकजूटीने या आंदोलनात भाग घेवून आंदोलन यशस्वी करुया. 2004 च्या MOU मध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आपणास आंदोलन उभारण्याशिवाय पर्याय नाही.
आपणां सर्वांच्या भक्कम पाठिंब्यामुळे कर्मचारी संघटना आपले उद्दिष्ट साध्य केल्याशिवाय रहाणार नाही व कामगारांना न्याय मिळवून देणारच याबद्दल आमच्या मनात तीळमात्रही शंका नाही.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !     कामगार एकता झिंदाबाद !!**

दि. १ मार्च २०१७

(प्रकाश दळवी)
अध्यक्ष